# <u>जाहिरात</u>

<u>Details on Website</u>

**<u>मराठी भाषा विभाग, मंत्रालय, मुंबई.</u>**

## <u>गट-ब (राजपत्रित व अराजपत्रित) संवर्गातील सेवेमधून सेवानिवृत्त झालेल्या अधिकाऱ्यांची यांची करार पध्दतीने नियुक्ती करण्याबाबत</u>

विभागामध्ये आस्थापना व सेवाविषयक बाबीमध्ये सल्ला देण्यासाठी **<u>"आस्थापना /सेवा सल्लागार"</u>** म्हणून **कक्ष अधिकारी गट-ब (राजपत्रित)** संवर्गातून सेवानिवृत्त झालेले अधिकारी व मराठी भाषा प्रचार प्रसाराबाबत विविध योजना /उपक्रम/प्रकल्प राबवितांना सहाय्य करण्यासाठी**"प्रकल्प सहायक"** म्हणून सहायक कक्ष अधिकारी **गट-ब (अराजपत्रित)** संवर्गातून सेवानिवृत्त झालेल्या अधिकाऱ्याची करार पद्धतीने एक वर्षाच्या कालावधीसाठी नियुक्ती करावयाची आहे.

**<u>अटी व शर्ती :-</u>**

१) सदर नियुक्ती केवळ १२ महिन्यांच्या कालावधीकरिता सामान्य प्रशासन विभागाच्या क्र.सीबीई-१५२५/प्र.क्र.३७/आस्थामं,(का.१३), दि.१०.०६.२०२५ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार करण्यात येणार आहे.

२) मराठी भाषा विभागामध्ये करार पध्दतीने नियुक्ती करण्यासाठी भरावयाची पदे, पात्रता, कामकाजाचे स्वरुप व अनुभव या बाबतचा तपशील खालील प्रमाणे :-

| अ.क्र. | पद | भरावयाची संख्या | पात्रता |
|---|---|---|---|
| १. | "आस्थापना / सेवा सल्लागार" | १ | राज्य शासनाच्या प्रशासकीय विभाग/कार्यालयातील आस्थापना व सेवाविषयक कामकाज व मराठी टिप्पणी लेखन व पत्रलेखन यामध्ये किमान ३ वर्षाचा अनुभव असलेले कक्ष अधिकारी गट-ब (राजपत्रित) संवर्गातील सेवानिवृत्त अधिकारी. |
| २. | "प्रकल्प सहायक" | १ | राज्य शासनाच्या प्रशासकीय विभाग/कार्यालयात शासनाच्या विविध योजना /उपक्रम/प्रकल्प याबाबतचे कामकाज व मराठी टिप्पणी लेखन व पत्रलेखन यामध्ये किमान ३ वर्षाचा अनुभव असलेले सहायक कक्ष अधिकारी गट-ब (अराजपत्रित) संवर्गातील सेवानिवृत्त अधिकारी. |

३) उमेदवारास मराठी भाषेचे चांगले ज्ञान असावे.

४) उमेदवाराचे वय ६५ वर्षांपेक्षा अधिक नसावे.

५) उमेदवार मुंबई अथवा लगतच्या जिल्ह्यात राहणारा असावा.

६) नियुक्तीच्या कालावधीत विवक्षित काम पूर्ण करण्याची जबाबदारी करारपध्दतीने नियुक्ती देण्यात आलेल्या व्यक्तीची असेल.

७) करारपध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींना कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय /वित्तीय अधिकार नसतील. अशी व्यक्ती कोणत्याही शासकीय पत्र/आदेश यावर स्वाक्षरी करण्यास पात्र असणार नाही.

८) आवश्यक अर्हता धारण करणाऱ्या इच्छुक सेवानिवृत्त अधिकाऱ्यांनी सदर पदाकरिता विहित नमुन्यात अर्ज सादर करावा.

९) उमेदवाराने त्यांचे अर्ज सदर पदाकरिता संकेतस्थळ वरील माहिती पाहून jayshri.netam@nic.in या मेल आयडीवर जाहिरात प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांच्या आत करावेत. या संदर्भात अधिक माहितीसाठी दूरध्वनीवर क्र. ०२२ २२८५१२२२ संपर्क साधावा. विहित दिनांकानंतर प्राप्त झालेल्या अर्जावर कार्यवाही करण्यात येणार नाही. तसेच या संदर्भातील कोणत्याही पत्रव्यवहाराची दखल घेण्यात येणार नाही.

१०) विभागास आवश्यक असलेली अर्हता व अनुभव नसलेल्या सेवानिवृत्त अधिकारी यांनी अर्ज सादर केल्यास अशा अर्जाचा विचार करण्यात येणार नाही. तसेच अशा अर्जासंदर्भात शासनाशी केलेल्या पत्रव्यवहाराची दखल घेण्यात येणार नाही, तसेच अशा अर्जाना उत्तर देण्यात येणार नाही.

११) मुलाखतीद्वारे पात्र उमेदवारांची निवड करण्यात येईल. उमेदवार निवडीबाबतचा संपूर्ण अधिकार विभागाचा राहील.

१२) करार पध्दतीने नियुक्त सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांस मराठी भाषा विभाग, ८ वा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ येथे काम करावे लागेल.

१३) इतर अटी व शर्ती सामान्य प्रशासन विभागाच्या क्र. क्र.सीबीई-१५२५/प्र.क्र.३७/आस्थामं (का.१३), दि.१०.०६.२०२५ च्या शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे राहतील.

**संपर्क :-** मराठी भाषा विभाग, नवीन प्रशासकीय भवन, ८ वा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

दूरध्वनीवर संपर्क : ०२२ २२८५१२२२
ईमेल : jayshri.netam@nic.in

**आपली,**

२०.३.२०२६

**( वासंती काळे )**
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन.**

# अर्जाचा नमुना

मंत्रालयीन सेवानिवृत्त कक्ष अधिकारी/सहायक कक्ष अधिकारी यांची करार पद्धतीने नियुक्ती करण्याकरिता अर्ज

| |
|---|
| उमेदवाराने अलीकडील काळातील स्वत:चे छायाचित्र येथे चिकटवावे |

१) अर्जदाराचे संपूर्ण नांव :-

२) अर्जदाराचा पत्ता :-

३) सेवानिवृत्तीच्या वेळचे पदनाम :-

४) भ्रमणध्वनी क्रमांक –

५) जन्म दिनांक व वय

६) विभागास आवश्यक अर्हता अर्जदाराकडे आहे काय? होय/नाही

७) अनुभव :- ---------------------------------------------------------------------------
----------------------------------------------------------------------------------------
----------------------------------------------------------------------------------------
-------------------------------- जाहिरात/सूचना मी काळजीपूर्वक वाचली असून सदर जाहिरातीतील / सूचनेतील सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत.

ठिकाण –:

दिनांक :-